महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
**नाशिक विभागीय मंडळ, नाशिक - ४२२ ००३.**

क्र.नाविमं/माध्य ब १/
नाशिक - ४२२ ००३
दिनांकः- २३/०६/२०२२

प्रति,
मुख्याध्यापक/प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा,
नाशिक/धुळे/जळगांव/नंदुरबार

**विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा** मार्च-एप्रिल २०२२ **चे गुणपत्रक वाटप करणेबाबत...**

या विभागीय मंडळामार्फत घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा मार्च-एप्रिल २०२२ परीक्षेचे गुणपत्रक **दि.०४/०७/२०२२** रोजी मंडळाच्या निर्धारीत वाटप केंद्रावर सकाळी **११.०० ते ०३.००** या वेळेत वाटप करण्यात येणार आहेत. आपणांस कळविण्यात येते की, विदयार्थ्यांना सदर गुणपत्रकाचे वाटप त्याच दिवशी दुपारी **३.००** वाजता करावयाचे आहे. सर्व गुणपत्रक आपल्याच शाळेतील विद्यार्थ्यांची असल्याची व गुणपत्रक बिनचूक असल्याची, खराब अथवा फाटलेली अथवा मुद्रणदोष नसल्याची खात्री करून संबंधित विद्यार्थ्यांना वितरीत करण्यात यावीत. एखादया विद्यार्थ्यांचे गुणपत्रक आपणांस प्राप्त न झाल्यास मंडळ प्रतिनिधीकडे त्याचवेळी किंवा दुस-या दिवशी ई-मेलद्वारे माहिती मंडळास कळविल्यास दखल घेण्यात येईल. विलंबाने त्रुटी कळविल्यास त्याचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक
शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ,
नाशिक ४२२ ००३.